Website : http://www.mscepune.in Email : mscepune@gmail.com दूरध्वनी क्र : ०२०-२६१२३०६६/२४१२३०६७ फॅक्स क्रमांक : ०२०-२६१२९९१९

जा.क्र.मरापप /शिष्यवृत्ती/२०१४/ ८६८२
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १.
दिनांक - ३०/१०/२०१४.

**प्रति,**

१ शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद (सर्व)

२ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
(पश्चिम/उत्तर/दक्षिण)

३ शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई
महानगरपालिका

**विषय - इयत्ता ४थी, ७वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्च २०१५.**
**शाळा माहिती प्रपत्र व ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या सूचना.**

वरील विषयी कळविण्यात येते की, मार्च २०१५ मध्ये होणाऱ्या इयत्ता ४थी, ७वी शिष्यवृत्ती परीक्षा व विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारण्यात येणार आहेत.

१) आपल्या जिल्ह्यातील सर्व शाळांना सोबत जोडलेल्या आवेदनपत्र भरण्याबाबतच्या सूचना गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत द्याव्यात.
२) ऑनलाईन आवेदनपत्रे भरताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी केंद्रप्रमुखांच्या स्तरावर संबंधीत शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक घेऊन सविस्तर सूचना द्याव्यात.
३) आवेदनपत्रे भरण्याचे कामकाज विहित वेळेत आणि अचूक पद्धतीने होण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांना आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.
४) परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावरील सूचना व महितीचे वेळोवळी अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही करावी.
५) या परीक्षेच्या कामकाजासाठी संकेतस्थळावर दिलेल्या मदत कक्षाच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून वेळोवळी शंकांचे निरसन करुन घ्यावे.
६) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याच्या कालावधीत आपल्या जिल्ह्यात स्थानिक परिस्थितीनुसार येणाऱ्या अडचणींचे वेळोवेळी निराकरण करावे.
**७) जिल्हा मुख्यालयात शिष्यवृत्ती परीक्षा कक्षाची स्थापना करावी व जिल्हा स्तरावरही शाळांना Helpline सुविधा उपलब्ध करुन द्यावी.**

**व्ही. बी. पायमल**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - १**

सोबत - कृतीओघ तक्ता, शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र भरण्याच्या सूचना व गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्यासाठी सूचना.

PC – 1/My Com/E/Scholarship/October Letter

# कृतीओघ तक्ता (FLOW CHART)
## (शाळेसाठी)

परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट देणे.

↓

संकेतस्थळाच्या होमपेज (Home page) वरील 'MSS/HSS शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज' या बटनावर क्लिक करुन शिष्यवृत्ती परीक्षेच्या पेजवर जाणे.

↓

शिष्यवृत्ती परीक्षेच्या पेजवरील सर्वसाधारण सूचना, शाळा माहिती प्रपत्र भरण्याच्या मुद्देनिहाय सूचना, ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना, या परीक्षांची माहिती पत्रके, परीपत्रके, शासननिर्णय इत्यादींचे बारकाईने वाचन करणे.

↓

परीक्षा परिषदेकडून प्राप्त झालेल्या Login Id आणि Password द्वारे Login करुन सर्व प्रथम शाळा माहिती प्रपत्र अचूकपणे भरणे.

↓

शाळा माहिती प्रपत्राची प्रिंटआऊट घेणे. त्यातील माहिती तपासणे, आवश्यकता असल्यास ऑनलाईन दुरुस्ती करणे. शाळा माहिती प्रपत्राची प्रिंट आऊट (माहिती अचूक असल्याची खात्री करण्यासाठी व शाळेच्या रेकॉर्डसाठी) घेणे.

↓

शाळा माहिती प्रपत्रात भरलेली माहिती अचूक असल्याची पुन्हा-पुन्हा खात्री करुन Confirm बटनावर क्लिक करणे.

↓

या पेजवरील उजव्या बाजूस असलेल्या Home बटनावर क्लिक करुन MSS(इ ४थी)/HSS(इ ७वी) चे ऑनलाईन आवेदनपत्र भरणे.

↓

परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे आवेदनपत्र (Form) अचूक भरुन save करणे.

'प्रपत्र अ' ची मूळ प्रत, असल्यास प्रमाणपत्रे (विद्यार्थ्याचे पालक भूमिहिन शेतमजूर असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, पालकाचे उत्पन्न रु.२०,०००/- (वीस हजार रुपये) पेक्षा कमी असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र) आणि चलनाची प्रत (Msce copy) केंद्रप्रमुखांमार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्याकडे जमा करुन पोहोच घेणे.

↑

'प्रपत्र अ' ची छायांकित प्रत (zerox) काढून विहित रकान्यात परीक्षार्थी व पालकांची स्वाक्षरी घेणे. मुख्याध्यापकांनी शाळेचा शिक्का उमटवून स्वतःची स्वाक्षरी करणे प्रपत्र अ ची छायांकित प्रत व चलनाची प्रत (School copy) शाळेत कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे.

↑

आवेदनपत्र भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी - 'प्रपत्र अ' (List of Applicants) ची प्रिंटआऊट घेणे.

↑

परिषदेच्या संकेतस्थळावर पुन्हा login करुन चलन अपडेट (Update) करणे.

↑

चलनाद्वारे रक्कम बँकेत भरणे.

↑

सर्व दुरुस्त्या झाल्यानंतरच ऑनलाईन चलनाची (SBI किंवा SBH) प्रिंट घेणे.

↑

चेक लिस्ट मध्ये त्रुटी/चुका असल्यास पुन्हा संबंधित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र उघडून दुरुस्ती करणे/सुधारणा करणे.

↑

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरल्यानंतर Show List या बटनावर क्लिक करुन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी यादी (check list) प्रिंट करणे.

# MSS/HSS (शिष्यवृत्ती) परीक्षा

## ● शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना ●

**सूचना -** १) शाळा माहिती प्रपत्र भरल्यानंतर त्यातील मुद्देनिहाय माहिती अचूक असल्याची खात्री करा व Save बटनावर Click करा.
२) आवश्यक ती सर्व माहिती भरल्यानंतर व ती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच Confirm बटणावर Click करा.
३) Confirm बटणावर Click केल्यानंतर शाळा माहिती प्रपत्रात कोणताही बदल करता येणार नाही.
४) शाळा माहिती प्रपत्र भरल्याशिवाय आणि Confirm बटणावर Click केल्याशिवाय ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत. तसेच सिस्टीम द्वारा स्वीकारली जाणार नाहीत.
५) शाळा माहिती प्रपत्र Confirm झाल्यानंतर स्क्रीनवरील Home बटनावर Click करा.
६) त्यानंतर ज्या परीक्षेची आवेदनपत्रे भरायची आहेत त्या परीक्षेच्या नावावर किंवा परीक्षेच्या नावाखाली असलेल्या New Form बटनावर Click करा.

---

**सावधान!** **Caution!**

- शाळा माहिती प्रपत्रात (School Profile) भरलेली माहिती अचूक असल्याची खात्री स्वतः मुख्याध्यापकांनी करावी.
- तसेच हे माहितीपत्रक भरण्याच्या व ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
- माहिती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच Confirm बटनावर Click करा.

### UDISE सांकेतांक -

- या मुद्दयापुढील चौकटीत आपल्या शाळेचा **<u>११ अंकी</u>** सांकेतांक आपोआप (by default) येईल. तो अचूक असल्याची खात्री करावी.
- युडायस क्रमांक माहित नसेल तर गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावा.

### शाळेचे पूर्ण नाव -

- या मुद्यापुढील चौकटीत आपल्या शाळेचे UDISE सिस्टिममध्ये नमूद केलेले नाव आपोआप (by default) येईल.
- आपोआप शाळेचे नाव येत नसेल तर इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये शाळेचे नाव टाईप करा.
- या चौकटीत शाळेचा पत्ता नोंदविण्याची गरज नाही. (पत्ता नोंदविण्यासाठी पुढे स्वतंत्र मुद्दा आहे.)

### शहर/नगर/गाव -

- या मुद्दयापुढील चौकटीत आपली शाळा ज्या शहरात/नगरात/गावात आहे फक्त त्या ठिकाणचे नाव इंग्रजी कॅपिटल लेटर्स मध्ये टाईप करा.

### शाळा व्यवस्थापन प्रकार -

- या मुद्दयापुढील चौकटीच्या ड्रॉप डाऊन लिस्ट मधील अचूक पर्याय निवडा.
  (ड्रॉप डाऊन लिस्ट - केंद्र शासन, राज्य शासन, जिल्हा परीषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषद, कटकमंडळ, ग्रामपंचायत, खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित, खाजगी मान्यताप्राप्त विना अनुदानित, खाजगी मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित)
- स्वयंअर्थसहाय्यित शाळांनी 'खाजगी मान्यताप्राप्त कायम विना अनुदानित' Private permanent Non Grantable हा पर्याय निवडावा.

**शाळेत शिकविला जाणारा अभ्यासक्रम -**

- आपल्या शाळेत जो अभ्यासक्रम शिकविला (राबविला) जातो, तो पर्याय अचूकपणे निवडा.
- एकापेक्षा जास्त अभ्यासक्रम शाळेत शिकविले जात असतील तर जेवढे पर्याय लागू आहेत तेवढे पर्याय निवडा.
- येथे निवडलेल्या अभ्यासक्रमापैकी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात अभ्यासक्रम उपलब्ध होतील.
- <u>लक्षात ठेवा</u> -
    - केवळ महाराष्ट्र शासनाचा (एमएससीईआरटी) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र ठरतात.
    - CBSE/ICSE/इतर या अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. (संदर्भ : शासन निर्णय. SPE/२००१/९३९७९/(२००३/२००१) साशि - १ दिनांक. १० ऑक्टोबर २००१)
    - आवेदनपत्रात चुकीचा अभ्यासक्रम नोंदविणाऱ्या मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल.

**शाळा माध्यम -**

- या मुद्दयासमोर उपलब्ध असलेल्या <u>**आठ माध्यमांपैकी**</u> शाळेस लागू असलेले माध्यम निवडा.
- एकापेक्षा अधिक माध्यमातून शिक्षण दिले जात असेल तर जेवढया माध्यमातून शाळेत शिक्षण दिले जात आहे तेवढया माध्यमांच्या पर्यायांची अचूकपणे निवड करा.
- येथे निवडलेले/निवडलेली माध्यमेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात उपलब्ध होतील.

**सेमी इंग्रजी -**

- या मुद्दयासमोर उपलब्ध असलेल्या <u>**सात माध्यमांपैकी**</u> लागू असलेले माध्यम अचूकपणे निवडा.
- एकापेक्षा जास्त सेमी इंग्रजी माध्यमातून शाळेत शिक्षण दिले जात असेल तर जेवढी सेमी इंग्रजी माध्यमे शाळेत असतील तेवढया सेमी इंग्रजी माध्यमांची निवड करावी.
- येथे निवडलेले/निवडलेली माध्यमेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रात उपलब्ध होतील.

**शहरी/ग्रामीण क्षेत्र -**

- या मुद्दयासमोरील क्षेत्राची अचूक निवड करा.
- गावाची लोकसंख्या विचारात न घेता ग्रामपंचायत क्षेत्रात असलेल्या शाळांनी 'ग्रामीण' या क्षेत्राचीच निवड करावी. (संदर्भ - शासन निर्णय क्र. विशेष-२००५/(४७/०५) साशि-१, मंत्रालय मुंबई, दि.३१ ऑक्टोबर २००५)
- ग्रामपंचायत वगळता इतर कोणतीही शासनसंस्था (स्थानिक स्वराज्य संस्था) असलेल्या नगर/ शहरातील शाळांनी 'शहरी' (URBAN) या पर्यायाचीच निवड करावी.
- <u>**लक्षात ठेवा**</u> - ग्रामीण व शहरी क्षेत्रासाठी वेगवेगळे शासनमान्य शिष्यवृत्ती संच आहेत. चुकीचे क्षेत्र निवडल्यास संबंधित शाळेचा मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**शाळेचा प्रकार -**

- आपली शाळा कोणत्या प्रकारची आश्रमशाळा आहे ते पहिल्या तीन पर्यायांमधून निवडा.
- आपली शाळा कोणत्याही प्रकारची आश्रमशाळा नसल्यास 'आश्रमशाळा व्यतिरिक्त शाळा' हा शेवटचा पर्याय निवडावा.

**शाळेचा पूर्ण पत्ता -**

- **स्थानिक पत्ता -**
    - घर नं, सर्व्हे नंबर, रस्ता, वॉर्ड, पेठ, क्षेत्र व जवळची खूण, चौक, स्टेशन, स्टँड, हॉस्पीटल, इत्यादीच्या जवळ अशी माहिती या मुद्दयासमोरील चौकटीत शाळेचा पूर्ण पत्ता इंग्रजी कॅपिटल लेटर्स मध्ये टाईप करा.
    - येथे शाळेचे नाव टाईप करण्याची आवश्यकता नाही.
- **गाव/शहर** - या मुद्दयाखालील चौकटीत आपल्या गावाचे/शहराचे नाव इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **पोस्ट** - या मुद्दयाखालील चौकटीत पोस्ट (पोस्टाचे ठिकाण व गाव) इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा. (उदा. SADASHIV PETH PUNE)
- **जिल्हा** -
    - या मुद्दयाखालील चौकटीत आपली शाळा ज्या जिल्ह्यात आहे, तो जिल्हा ड्रॉप डाऊन लिस्टमधून अचूकपणे निवडा.
    - मुंबई शहरातील शाळांनी आपली शाळा मुंबई उत्तर, मुंबई पश्चिम, मुंबई दक्षिण या तीन पैकी कोणत्या जिल्ह्यात आहे तो जिल्हा अचूकपणे निवडावा.
    - उपरोक्तबाबत शंका असल्यास वॉर्ड ऑफिसर/शिक्षण उपनिरीक्षक/ शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.
    - **पालघर जिल्ह्याबाबत -**
        - पालघर जिल्हा नव्याने अस्तित्वात आला असला तरी, या जिल्ह्याशी संबंधित शाळांनी ठाणे जिल्ह्याचीच निवड करावी.
        - याबाबत वेळोवेळी सुधारणे प्रमाणे सूचना दिल्या जातील त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
- **पिन कोड** - सहा अंकी पोस्टल पिन कोड नमूद करा.
- **दूरध्वनी क्रमांक** - STD कोडसह शाळेचा दूरध्वनी क्रमांक नमूद करा. शाळेस दूरध्वनी नसल्यास ह्या मुद्दयाखालील चौकट रिकामी ठेवा.

**तालुका/तहसिल -**

- जिल्ह्याची निवड केल्यानंतरच या मुद्दयाखालील चौकटीत ड्रॉप डाऊन लिस्टमधील आपला तालुका अचूकपणे निवडावा. (शिष्यवृत्ती परीक्षेसाठी असलेल्या तालुका/वॉर्डाची निवड करावी)
- **लक्षात ठेवा** - शिष्यवृत्ती परीक्षेसाठी **४०६ तालुके** आहेत. शहरांतील शाळांनी विशेषतः नगरपालिका/ महानगरपालिका क्षेत्रातील शाळांनी आपल्या तालुक्याची निवड करण्यापूर्वी वॉर्ड ऑफिसर/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी/गटशिक्षणाधिकारी/शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांचेशी संपर्क साधावा.

**परीक्षा केंद्र सांकेतांक -**

- **HSS**(इ.७वी) या मुद्दयाखालील चौकटीत माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आपल्या शाळेचे गतवर्षी जे परीक्षा केंद्र होते त्या केंद्राचा **सहा अंकी** सांकेतांक टाईप करा. चालू वर्षी या परीक्षेस (HSS) विद्यार्थी बसवायचे नसतील तर ०००० टाईप करा.
- **MSS** (इ.४थी) या मुद्दयाखालील चौकटीत आपल्या शाळेचे गतवर्षी जे परीक्षा केंद्र होते, त्या केंद्राचा **सहा अंकी** सांकेतांक टाईप करा. चालू वर्षी या परीक्षेस (MSS) विद्यार्थी बसवायचे नसतील तर ०००० टाईप करा.
- याबाबत शंका असल्यास शिक्षण विस्तार अधिकारी/वॉर्ड ऑफिसर/गट शिक्षणाधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

**परीक्षा परिषद शाळा सांकेतांक (school code) -**

- या मुद्दयासमोरील चौकटीत आपल्या शाळेचा **सात अंकी** सांकेतांक टाईप करा.
- पालघर जिल्हा नव्याने अस्तित्वात आला असला तरी या जिल्ह्यातील शाळांचे सांकेतांक (School code) पूर्वीप्रमाणेच राहतील.
- लक्षात ठेवा -
    - एका शाळेला एकच **सात अंकी** सांकेतांक गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून देण्यात येतो.
    - हा सांकेतांक शाळेचा प्रकार (प्राथमिक/माध्यमिक) व शाळेत राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाशी (महाराष्ट्र शासन/सीबीएसई/आयसीएसई) संबंधित असतो.
    - एकच शाळा असून ४थी व ७वी (दोन वेगळया स्तरासाठी) वेगवेगळे मुख्याध्यापक असल्यासच एका शाळेस दोन वेगवेगळे शाळा सांकेतांक असू शकतात, त्यानुसार दोन्ही चौकटीत शाळा सांकेतांक नोंदवा. एका शाळेस दोन वेगवेगळे सांकेतांक असतीलच असे नाही.
    - शाळेस परीक्षा परिषद सांकेतांक (school code) मिळाला नसल्यास गटशिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.
    - शाळेस एकच शाळा सांकेतांक असल्यास दोन्हीही चौकटीत तो अचूकपणे नोंदवा.

**मुख्याध्यापकाचे नाव -**

- या मुद्दयापुढील तीन वेगवेगळया चौकटीत अनुक्रमे मुख्याध्यापकांचे आडनाव, प्रथम नाव, वडिलांचे/पतीचे नाव अचूकपणे इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.

**संपर्क माहिती -**

- या मुद्दयापुढील दोन वेगवेगळया चौकटींपैकी पहिल्या चौकटीत मुख्याध्यापकांचा मोबाईल क्रमांक (१० अंकी) टाईप करावा.
- दुसऱ्या चौकटीत शाळेचा किंवा मुख्याध्यापकांचा 'ई' मेल आयडी इंग्रजी स्मॉल लेटर्समध्ये व अचूक फॉरमॅटमध्ये टाईप करावा.

**शाळेस इंटरनेट कनेक्शन आहे का?**

- या मुद्दयापुढील होय/नाही पैकी योग्य पर्याय निवडा.

**शाळा संलग्नता शुल्क -**

- हे शुल्क दरवर्षी शाळेने भरणे आवश्यक आहे. NTS किंवा NMMS परीक्षेसाठी चालू शैक्षणिक वर्षात हे शुल्क भरले असल्यास पुन्हा हे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.
- NTS किंवा NMMS परीक्षेची आवेदनपत्रे भरताना हे शुल्क भरले असल्यास शुल्क भरल्याच्या चलनाचा क्रमांक व दिनांक नमूद करा.
- **लक्षात ठेवा** - NTS, NMMS, MSS आणि HSS या चारही शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकत्रित शाळा संलग्नता शुल्क २०० रुपये इतके आहे.

---

**टिप -**

- संबंधित मुद्दयांबाबतची पुराव्याची कागदपत्रे शाळेत उपलब्ध ठेवावीत.
- उपरोक्त मुद्दयांबाबतची कागदपत्रे शाळेत जतन करुन ठेवावीत.
- परीक्षा परिषदेच्या सूचनेप्रमाणे परिषदेस कागदपत्रांची आवश्यकता असेल तेव्हा ती परिषदेच्या सुचनेप्रमाणे परिषदेकडे सादर करण्यात यावीत.
- उपरोक्त कार्यवाहीत कसूर झाल्यास शिस्तभंगाची कारवाई संबंधितांवर करण्यांचा विचार केली जाईल याची नोंद घ्यावी.